# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.06.2024** **वारःशुक्रवार**

---

१.केंद्रात नवीन सरकार स्थापन करण्याच्या अनुषंगानं रालोआच्या गोटात हालचालींना वेग, रालोआ संसदीय पक्षाची आज बैठक

२.लोकसभा निवडणुकीच्या निकालांनंतर सर्व पक्षांमध्ये चर्चा-बैठकांचं सत्र

३.राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन २७ जूनपर्यंत लांबणीवर

४.शिवराज्याभिषेक सोहळ्याचा साडेतीनशेवा वर्धापन दिन राज्यात उत्साहात साजरा आणि

५.मॉन्सूनचं राज्यात आगमन; कोकणासह विविध ठिकाणी आज मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

**नड्डा बैठक**

केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएचं सरकार स्थापन होणार हे स्पष्ट झाल्यानंतर काल नवी दिल्लीत त्या दिशेनं आघाडीच्या गोटात हालचालींना वेग आला होता. भाजप अध्यक्ष जे.पी नड्डा यांनी काल त्यांच्या निवासस्थानी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांबरोबर बैठक घेतली. या बैठकीला अमित शहा, राजनाथ सिंह, पियूष गोयल, प्रल्हाद जोशी, मनसुख मांडवीय, अश्विनी वैष्णव, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुग, विनोद तावडे आदी नेते उपस्थित होते. संयुक्त जनता दलाचे नेते आणि बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार यांच्या नवी दिल्ली इथल्या निवासस्थानीही त्यांच्या पक्षाचे अनेक नेते दाखल झाले आहेत. आज नवी दिल्लीत एनडीएच्या संसदीय पक्षाची बैठक होणार आहे. भाजपसह आघाडीतील - तेलुगू देसम,जदयु, लोजपा, शिवसेना, धर्मनिरपेक्ष जनता दल यासह इतर घटक पक्षांचे नवनिर्वाचित खासदार या बैठकीला उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

**इंडिया आघाडी बैठका**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पुढील रणनीती आखण्यासाठी इंडी आघाडीच्या नेत्यांनीही काल नवी दिल्लीत अनेक बैठका घेतल्या. तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि खासदार अभिषेक बॅनर्जी आणि पक्षाचे नेते डेरेक ओब्रायन यांनी समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांची भेट घेतली तर आम आदमी पक्षाचे नेते आणि राज्यसभा खासदार राघव चढ्ढा यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांची भेट घेतली.

**अजित पवार**

राष्ट्रवादी काँग्रेसचा कोणताही आमदार शरद पवार गटाच्या संपर्कात नाही; सर्व आमदार आमच्याबरोबर असल्याचं बैठकीनंतर स्पष्ट झालं, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी काल सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची काल मुंबईत बैठक झाली; त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. व्यक्तिगत कारणांमुळे पाच आमदार बैठकीला येऊ शकले नाहीत, असं ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीचे निकाल समाधानकारक नाहीत; मात्र, या अपयशानं खचून न जाता नव्या उमेदीनं विधानसभा निवडणुकांना सामोरे जाण्याचा निर्णय घेण्यात आल्याचंही अजित पवारांनी सांगितलं. या निकालांची सर्वस्वी जबाबदारी आपली असून जनतेचा कौल नम्रपणे स्वीकारत असल्याचंही अजित पवारांनी सांगितलं.

**<u>बैठका भेटीगाठी</u>**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर शिवसेनेच्या सर्व नवनिर्वाचित खासदारांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत वर्षा निवासस्थानी चर्चा केली. निवडणुकीत नक्की कुठे कमी पडलो याचाही आढावा त्यांनी या बैठकीत घेतला.

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी काल मनसे प्रमुख राज ठाकरे यांची मुंबईत त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदारांनीही काल मुंबईत उद्धव ठाकरेंची भेट घेतली.

जयंत पाटील

राज्यात केंद्र सरकारपेक्षा राज्य सरकारच्या विरोधात अधिक नाराजी असून येत्या विधानसभेत सत्ताधाऱ्यांना याचा मोठा फटका बसेल, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

अजित पवार गटाच्या आमदारांना पक्षात परत घेण्याबाबत योग्यवेळी भाष्य केलं जाईल, असंही जयंत पाटील यांनी स्पष्ट केलं. आमचा पक्ष आता स्वच्छ नेत्यांचा असून येत्या विधानसभा निवडणुकीतही तरुणांना, तसंच स्वच्छ प्रतिमा असलेल्या उमेदवारांना संधी दिली जाईल, असं त्यांनी सांगितलं

**<u>लोससचिवालय</u>**

अठराव्या लोकसभेवर निवडून आलेले विविध पक्षांचे खासदार कालपासून नवी दिल्लीत पोहोचण्यास सुरुवात झाली आहे. लोकसभा सचिवालयानं या नवनिर्वाचित खासदारांच्या स्वागताची तयारी पूर्ण केली आहे. या खासदारांच्या स्वागताबरोबरच त्यांच्या नोंदणीचं काम सुरळितपणे पार पडण्यासाठी विविध उपाय करण्यात आले असल्याची माहिती लोकसभा सचिवालयानं प्रसिद्धी निवेदनाद्वारे दिली आहे. नवीन खासदारांचा वेळ वाचावा यासाठी सॉफ्टवेअर ॲप्लिकेशनद्वारे त्यांची नोंदणी केली जाणार आहे.

**<u>आचारसंहिता</u>**

लोकसभेचे सर्व निकाल जाहीर झाल्यानंतर त्यासाठी लागू केलेली आदर्श आचार संहिता उठवण्यात आली असल्याचं काल निवडणूक आयोगानं सांगितलं. लोकसभा निवडणुकांची १६ मार्च रोजी घोषणा झाली, तेव्हापासून आचारसंहिता लागू झाली होती. दरम्यान राज्यात विधानपरिषदेच्या काही पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकांची संपूर्ण प्रक्रिया पार पडेपर्यंत संबंधित मतदारसंघांमध्ये अजूनही आचारसंहिता लागू राहणार आहे.

या लोकसभा निवडणुकीत देशातल्या ६५ पूर्णांक ७९ शतांश टक्के मतदारांनी मतदान केल्याची माहितीही निवडणूक आयोगानं दिली आहे. दरम्यान, राज्यातल्या राज्यसभेच्या एका जागेसाठी आणि केरळमधल्या ३ जागांसाठी अधिसूचनाही काल जारी करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्या राजीनाम्यामुळे राज्यातली जागा रिक्त झाली आहे. यासाठी १३ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील आणि गरज पडल्यास २५ जून रोजी मतदान होईल.

**<u>विधीमंडळ अधिवेशन</u>**

राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन १० जून ऐवजी २७ जूनपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य सरकारनं काल घेतला.

मुंबईत मंत्रीमंडळाची बैठक झाल्यानंतर मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ही माहिती दिली. पाणी टंचाईच्या समस्येवर तातडीनं तोडगा काढावा असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत प्रशासनाला दिले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या बैठकीला दूरस्थ माध्यमातून उपस्थित होते.

**<u>शिवराज्याभिषेक</u>**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचा साडेतीनशेवा वर्धापन दिन काल राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त राज्यात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांच्या आयोजनातून शिवरायांना अभिवादन करण्यात आलं. राज्यपाल रमेश बैस यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना आदरांजली अर्पण केली. त्याचबरोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री  अजित पवार यांनी समाजमाध्यमांवरील संदेशाद्वारे महाराजांना मानवंदना दिली.

हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडावरही शिवराज्याभिषेक दिन मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी देशभरातील हजारो शिवभक्त रायगडावर जमले होते. तसंच यानिमित्त रायगड फुलांनी सजविण्यात आला होता. छत्रपती संभाजी राजे यांच्या उपस्थितीत काल सकाळी शिवरायांना ढोल ताशांच्या गजरात मानवंदना देण्यात आली. यावेळी मर्दानी खेळ, शाहिरी नजराणा, पालखी सोहळा अशा कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. संपूर्ण रायगड जय जिजाऊ जय शिवराय, शिवाजी महाराज की जय च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता.

पुणे, सांगली, सिंधुदुर्ग, परभणीसह राज्यात इतरत्र देखील शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

**<u>राज्यपाल</u>**

राज्यातील ११५ पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदारांना राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते काल पोलीस शौर्य पदक, उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक तसंच गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदक समारंभपूर्वक प्रदान करण्यात आलं. मुंबईत राजभवन इथं झालेल्या या सोहळ्यात २०२१च्या स्वातंत्र्य दिनी तसंच २०२२च्या प्रजासत्ताक दिनी जाहीर झालेली पोलीस पदकं देण्यात आली.

**<u>कोयी</u>**

जागतिक पर्यावरण दिनाचं औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आंब्याच्या कोयी संकलनाची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. कोयी संकलनासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष वाहनात 12 हजाराहून अधिक कोयी जमा झालेल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर कोयी संकलित होणार असल्याने त्यामधील कोयीतून तयार होणारी काही वृक्षरोपे नवी मुंबईच्या आम्रवृक्ष संवर्धनासाठी ठेवून उर्वरित साधारणत: 1 लाख संकलित कोयी रेड एफएमच्या 'गुठली रिर्टन्स' या पर्यावरण संवर्धक उपक्रमासाठी दिल्या जाणार आहेत.

**<u>पाऊस, वीज</u>**

गडचिरोली जिल्ह्याच्या चामोर्शी तालुक्यात काल संध्याकाळी वेगवेगळ्या ठिकाणी वीज पडून दोन जणांचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले. नांदेड जिल्ह्यातही काल वीज पडून एकाचा मृत्यू झाला. सांगली जिल्ह्यातही काल वादळी वारा आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळ पेरणीपूर्व शेती मशागतीच्या कामांना वेग आला आहे. कोकणात काही ठिकाणी तसंच पुण्यातही काल पावसाने हजेरी लावली.

**<u>मान्सून-हिं.स.</u>**

मान्सून काल राज्यात दाखल झाला. कोकणातील रत्नागिरी, तसंच  सोलापूरसह काही भागात मान्सून पोहोचल्याची माहिती  हवामान खात्याच्या   पुणे शाखेचे प्रमुख डॉ. कृष्णानंद होसाळीकर यांनी समाज माध्यमावरून दिली. त्यामुळे गेले जवळ जवळ दोन महीने उन्हाळ्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे. येत्या 24 तासात राज्यात अनेक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार .**